# 21 डिसेंबर

## आजचा सुविचार :

**“अशक्य हा शब्दच आपल्या शब्दकोशातून काढून टाका.”**

## आजचे पंचांग :

**वार – मंगळवार** | **दिनांक : 21 डिसेंबर 2021**

**तिथी – मार्गशीर्ष** | **नक्षत्र – पुनर्वसू**

**सुर्योदय – सकाळी 6.54 वाजता** | **सूर्यास्त – सायंकाळी 6. 06 वाजता**

## आजचे दिनविशेष :

**1905 : स्वातंत्र्यवीर सावरकर बी. ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाले**

**1972 : आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय. एस. जगनमोहन रेड्डी यांचा जन्म**

## आजचे इंग्लिश शब्द :

**1) Village – गाव    2) City - शहर    3) Taluka– तालुका    4) District – जिल्हा**

## आजची प्रश्नमंजुषा :

**1) तुमच्या घरी कोणकोणते सण साजरे करतात?**
**2) “हत्ती” या प्राण्याचे तुम्हाला माहित असलेले अवयव सांगा.**
**3) तुम्हाला माहित असलेल्या साहसी खेळांची नावे सांगा.**
**4) बेळगाव विभागातील प्रमुख पिकांची नावे सांगा.**

## बोधकथा :

### परीस

एक माणूस परीस शोधायला निघाला.... त्यासाठी रस्त्यात जो दगड येईल तो घ्यायचा, गळ्यातल्या साखळीला लावायचा आणि फेकून द्यायचा असा त्याचा दिनक्रम सुरू झाला दिवस गेले... महिने लोटले... वर्षे सरली.... पण त्याच्या दिनक्रमात बदल झाला नाही . दगड घ्यायचा, साखळीला लावायचा आणि मग तो फेकून द्यायचा.... शेवटी तो माणूस म्हातारा झाला.... आणि ज्या क्षणि तो आपले शेवटचे श्वास मोजत होता त्यावेळी अचानक त्याचे लक्ष त्याच्या गळ्यातील साखळीकडे गेले... ती साखळी सोन्याची झाली होती..... दगड घ्यायचा, साखळीला लावायचा आणि फेकून द्यायचा या नादात त्याचे साखळीकडे लक्षच गेले नाही.

**तात्पर्य:** प्रत्येकाच्या जीवनात एकदा तरी परीस येत असतो...कधी आई- वडिलांच्या रूपाने, तर कधी भाऊ-बहीनीच्या नात्याने...तर कधी मित्राच्या मैत्रिणीच्या नात्याने ..... कोणत्या ना कोणत्या रूपात तो आपल्याला भेटत असतो... आणि आपल्यातल्या लोखंडाचे सोने करीत असतो...... आपण जे काही असतो किवा बनतो त्यात त्यांचा बराच हातभार असतो.